सं. फौ. ख. क्र. ३२८/२०१९ निशाणी २३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – राम मधुकर आंबेकर

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – ए.एस.आय. पोलीस मुख्यालय, अकोला

पत्ता – गिता नगर अकोला ता. जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. १७.०६.२०१९ रोजी मी पोलीस नाईक म्हणून पोलीस स्टेशन उरळ येथे कार्यरत होतो. त्या दिवशी मी हजर असतांना ठाणेदार उरळ यांना मौजे गायगांव येथील इसम नामे सलमान खान हुसैन खान याने त्याच्या राहत्या घरात अवैधरित्या डिझेलचा साठा विक्रीसाठी करून ठेवल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीमिळाल्यावरून मी, ठाणेदार सतीश पाटील आणि पो.कॉ. प्रवीण असे गायगांव येथे गेलो. तेथे ठाणेदार यांनी २ पंचांना बोलावून त्यांना बातमीचा आशय समजावून सांगितला व त्यांना पंच म्हणून रेड कामी हजर राहण्यास सांगितले. पंचांनी होकार दिल्यानंतर त्यांना घेवून आम्ही खाजगीवाहनांने गायगांव येथे सलमान खान हुसैन खान याच्या घराजवळ पोहोचलो. तेथे उभ्या असलेल्या इसमाला त्याचे नाव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव सलमान खान हुसैन खान वय १९ वर्षे असल्याचे सांगितले. ठाणेदार यांनी त्याला आमचे येण्याचे कारण सांगून ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही हजर इसमाच्या घराचे आवारात जावून पाहणी केली असता आम्हांला एक २५ लिटरचा प्लॅस्टीकचा कॅन दिसून आला. त्याची पाहणी केली असता त्यामध्ये २५ लिटरचा डिझेल सारखा वास येणारा द्रव पदार्थ दिसून आला. त्या ठिकाणी एक १०० फुट लांबीचा प्लॅस्टीकचा पाईप दिसून आला त्यामधून देखील डिझेल सारखा वास येणारा द्रव पदार्थ दिसून आला.

२. त्यानंतर ठाणेदार यांनी पंचा समक्ष ३ काचेच्या बाटल्यांमध्ये सी.ए. करीता नमुने काढले. सदर बाटल्यांना लेबल लावून सिल केले व त्यावर पंच, आरोपी आणि ठाणेदार यांनी सहया केल्या. नमुन्यांसाठी काढलेल्या बाटल्या आणि उर्वरित मुददेमाल जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त केल्या. त्यानंतर आम्ही मुददेमाल आणि आरोपीसह पोलीस स्टेशनला आलो. ठाणेदार श्री पाटील यांनी सदर घटनेचा रिपोर्ट दिला. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकेल.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. बी.पी. उपर्वट यांचे मार्फत .</u>**

३.	गायगांव येथून पोलीस स्टेशन उरळ येथे जाणेसाठी वाहनाने अर्धातास लागतो. गायगांव हे तीन ते साडे तीन हजार लोकवस्तीचे गाव आहे. घटनास्थळाचे आजूबाजूला इतर लोकांची १०–१५ घरे आहेत. घटनास्थळाचे आजुबाजूला दोन्ही बाजूने रस्ता आहे. रस्ता असल्यामुळे तेथून लोकांची नेहमी वर्दळ असते.

प्रश्न – तुम्ही हजर इसमाचे ओळखपत्र पाहिले का ?

उत्तर – मी पाहिले नाही. ठाणेदार यांनी पाहिले असेल.

४.	हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यासाठी हजर राहणे करीता ठाणेदार यांनी लेखी नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ठाणेदार यांनी पोलीस स्टेशनला बसून पंचनामे केले म्हणून पंचांना लेखी नोटीस दिल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकूर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ठाणेदारयांनी बेवारस पडलेला मुददेमाल आरोपीच्या नावे दाखविला. हे म्हणणे खरे नाही मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.03.09 11:50:08 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

बाळापूर.
दि.०६/०३/२०२६